# ९. शेरास सव्वाशेर

नानाकाका घुंगूरकाठी आपटत शेताच्या बांधावरून फिरत होते. वाऱ्यावरून डोलणारी समोरची शेती पाहून ते आनंदाने डोलत होते. निबर, सोन्यासारखे पिवळे भाताचे पीक ! नंतर कापणी, झोडणी, मळणी आणि मग कणगीत पडेल वर्षभराची बेगमी, असा विचार त्यांच्या मनात येत होता.

'निसर्गाने करुणा केली, भाते पिकुनी पिवळी झाली,' असे गाणे गुणगुणत नानाकाका माळावरच्या शेतापाशी थांबले. दाणे भरलेल्या लोंब्या आडव्या पडल्या होत्या. शेताची नासाडी चालू होती. शेतावर उंदीरमामा कोपले होते. नानाकाकांनी एक प्रयोग करण्याचे ठरवले. त्यांनी शेताजवळच्या माळावर एक मोठा गोल खड्डा खणला. त्या खड्ड्यात पत्र्याचे एक मोठे पिंप ठेवले. ते अर्धेअधिक पाण्याने भरले. त्याच्या मोकळ्या तोंडावर एक तरफेसारखी हलकी लांब फळी बसवली. पिंपावरच्या फळीच्या टोकाला तळलेली भजी ठेवली. अंधार पडला आणि नानाकाका शेतावरून घरी आले.

सर्वत्र सामसूम झाल्यावर उंदरांची टोळी बाहेर पडली. तळलेल्या भज्यांच्या खमंग वासाने सर्वच उंदीर पिंपापाशी धावत आले. पिंपावर ठेवलेल्या फळीच्या एका टोकाला भजी ठेवलेली त्यांना दिसली. घाईघाईने तीन-चार उंदीर पुढे धावले. त्यांच्या भाराने सगळेच उंदीर पिंपाच्या पाण्यात डबकन पडले. सारे बुडून मरून गेले.

सकाळी सकाळीच अधीरतेने नानाकाका पिंपापाशी आले. आपली युक्ती सफल झालेली पाहून त्यांना खूप समाधान वाटले. संध्याकाळी पुन्हा खमंग भजी ठेवून नानाकाका घरी आले.

परत दुसऱ्या दिवशी सकाळी नानाकाका पिंपापाशी गेले. फळीवरची भजी फस्त केलेली होती, पण पिंपामध्ये मात्र एकही उंदीर दिसला नाही. त्यांना फारच आश्चर्य वाटले. हा काय प्रकार आहे, हे त्यांनी जाणून घ्यायचे ठरवले.



BR22V4



संध्याकाळी अंधार पडायच्या सुमारास नानाकाकांनी खमंग वास सुटलेली भजी फळीच्या टोकापाशी ठेवली आणि जवळच झाडाच्या आडोशाला ते लपून बसले. रात्र चांदणी होती. नीरव शांतता पसरली आणि उंदरांची फौज स्वारीवर निघाली. सर्वत्र भज्यांचा वास सुटला होता. मोठ्या अधीरतेने उंदीर पिंपापाशी जमले. आपसात काहीसे कुजबुजले. त्यांच्यापैकी चार-पाच उंदीर पिंपाबाहेरच्या फळीच्या टोकावर बसले व एक उंदीर फळीवरून पुढे सरसावला. प्रत्येकाने एक-एक करून तेथील सर्व भजी आणली. ती सर्व भजी त्या चतुर उंदरांनी कुरतडून मजेने खाल्ली आणि पुढच्या मोहिमेवर कूच केले.

शेरास सव्वाशेर भेटलेल्या त्या चतुर उंदीरमामांची युक्ती पाहून नानाकाकांनी आपल्या कपाळावर हात मारून घेतला.

**– पॉल रुमाव**

**शब्दार्थ :** **निबर** – जून, काढणीस आलेले पीक. **बेगमी** – साठा. **कोपणे** – रागावणे. **तरफ** – टेकू दिलेली लाकडी फळी. **सामसूम होणे** – शांतता पसरणे. **अधीर होणे** – उत्सुक होणे. **फस्त करणे** – संपवणे. **नीरव** – कसलाही आवाज नसलेले शांत वातावरण. **कुजबुजणे** – हळू बोलणे. **कूच करणे** – निघणे. **कपाळावर हात मारणे** – निराश होणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) नानाकाका आनंदाने का डोलत होते ?

(आ) सर्वच उंदीर पिंपापाशी का धावत आले ?

(इ) झाडाच्या आडोशाला कोण लपून बसले होते ?

**प्र. २. तर काय झाले असते ?**

(अ) नानाकाकांनी उंदीर पकडण्यासाठी पिंजरा ठेवला असता तर.......

(आ) नानाकाकांच्या शेतात साप असते तर ......

(इ) नानाकाकांच्या शेतात उंदीर नसते तर ......

(ई) नानाकाकांच्या शेतात मांजर असते तर ......

**प्र. ३. खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा व लिहा.**

(अ) अधीर होणे.

(आ) फस्त करणे.

(इ) सामसूम होणे.

(ई) कूच करणे.

(उ) कपाळावर हात मारणे.

(ऊ) युक्ती सफल होणे.

**प्र. ४. खालील शब्दांच्या सुरुवातीला 'अ' लावून नवीन शब्द तयार करा.**

(अ) धीर (आ) शक्य (इ) स्वस्थ (ई) प्रकाशित

**प्र. ५. 'शेरास सव्वाशेर' यासारख्या शब्दसमूहांना म्हणी म्हणतात. तुम्ही ऐकलेल्या, वाचलेल्या अशा म्हणी सांगा.**

**प्र. ६. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा, लिहा.**

(अ) नासाडी

(आ) कपाळावर

**प्र. ७. नानाकाकांनी उंदीर मारण्याचा प्रयत्न केला, पण उंदरांनी भजी फस्त करून त्यांचीच फजिती केली; म्हणजे उंदीर शेरास सव्वाशेर ठरले. तुम्ही वाचलेल्या एखाद्या गोष्टीत कुणी शेरास सव्वाशेर ठरले आहे का ? अशी गोष्ट वर्गात सांगा.**

**उपक्रम :**

१. धान्यांचे नमुने गोळा करा व कार्डपेपरवर/पुठ्ठ्यावर दाणे चिकटवून नक्षीकाम करा.

२. शेतीविषयक अवजारांची चित्रे मिळवा. वहीत चिकटवा. त्या चित्रांखाली त्यांची माहिती लिहा. (किमान तीन चित्रे.)

३. मातीचे बैल तयार करा. त्यांना रंग द्या.

४. शिवार-फेरी काढा. शिवारात काम करणारे कष्टकरी, शेतकरी, पशुपालन करणारे यांच्याशी गप्पा मारा.

**वाचा.**

बरेचसे प्राणी आपल्या उपयोगी पडतात, तर ढेकूण, डास असे काही कीटक व प्राणी आपल्याला उपद्रव देतात. उंदीर हा असाच एक उपद्रवी प्राणी आहे. शेतातील पिकांची, घरातील धान्यांची तो नासाडी करतो. घरातील कपडे, वस्तू कुरतडतो. एका अर्थाने उंदीर आपले नुकसान करतो म्हणून उंदराला पकडण्यासाठी पिंजरा लावतात.

## आम्ही चित्र वाचतो

- चित्रे पाहा. प्रत्येक चित्रातील प्रसंग ओळखा व त्याचे वर्णन करा.
- प्रत्येक चित्रातील व्यक्ती एकमेकांशी काय बोलत असतील, ते कल्पना करून लिहा.




















- **तुमच्या परिसरातील शिक्षक, पोस्टमन, शेतकरी, ग्रामसेवक, सरपंच, विविध व्यावसायिक, नर्स/डॉक्टर इत्यादी व्यक्तींशी खालील प्रश्नांच्या मदतीने संवाद साधा. मिळवलेली माहिती वर्गात सांगा.**
  - तुमचं नाव काय ?
  - तुम्ही कुठे राहता ?
  - तुम्ही हे काम किती वर्षं करत आहात ?
  - कामाचं स्वरूप काय असतं ?
  - तुम्ही करत असलेलं काम तुम्हांला आवडतं का ?
  - तुमच्या कामातून तुम्ही लोकांना कशी मदत करता ?
  - लोक तुमच्याशी कसं वागतात ?
  - तुमच्या आठवणीतला एखादा महत्त्वाचा प्रसंग सांगा.
  - लहानपणी तुम्हांला कोण व्हावं असं वाटायचं?
  - तुम्ही आम्हांला काय संदेश द्याल ?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रातील व्यक्ती, प्रसंग ओळखण्यास सांगावे. त्या व्यक्तींच्या व्यवसायांविषयी माहिती विचारावी. परिसरातील व्यक्तींच्या घरी जाऊन किंवा भेट ठरवून मुलाखत घेण्यास सांगावे. शक्य झाल्यास एखाद्या व्यावसायिकाला शाळेत बोलवावे. प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करावे. कोणते प्रश्न विचारावे याबाबत आधी चर्चा करावी. काही प्रश्न निश्चित करावे. जमा झालेली माहिती संग्रहित करायला मुलांना मदत करावी. शिक्षकांनी अधिकची माहिती सांगावी. कोणत्याही एका चित्राबद्दलची माहिती लिहिण्यास सांगावे. अशा मुलाखतींचा संग्रह हस्तलिखित स्वरूपात विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावा.